अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर

## मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील महिला ठार

✔ **सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील महिला ठार तर अन्य दोघे जखमी झाले. हा अपघात मोदी पोलीस चौकी ते स्टेशन मार्गावरील कुमार चौकात सोमवारी (दि.२४) दुपारच्या सुमारास घडला. देवम्मा नाटेकर (वय ४५ रा. जमखंडी ता.शहापूर जि.कलबुर्गी) असे मृत महिलेचे नाव आहे.

हुलगेम्मा कट्टीमनी (वय ४५) आणि मोनिश जगले (वय २० दोघे रा. लिमयेवाडी, सोलापूर) हे जखमी झाले. हुलगेम्मा कट्टीमनी यांची प्रकृती गंभीर आहे. सोमवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास मोनीश जगले याच्या सोमवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास मोनीश जगले याच्या दुचाकी पाठीमागे देवम्मा नाटेकर आणि हुलगेम्मा कट्टीमनी असे जहागीरदार हॉस्पिटलकडे निघाले होते. कुमार चौकात विरुद्ध दिशेने येणारी एमएच१३- एके-२२२२ या क्रमांकाची मोटर समोरून धडकल्याने तिघेही जखमी झाले होते. देवम्मा नाटेकर या उपचारापूर्वी मयत झाल्या. अन्य जखमेना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून हवालदार वाडीकर तपास करीत आहेत.





# प्रियांशच्या दफन खड्ड्यावर अखेर सरली माती

**✔ सोलापूर : महापालिकेच्या मोदी स्मशानभूमीतून प्रियांश वाघमारे या दहा महिन्याच्या बालकाचा मृतदेह गायब होण्यावर आठ दिवस उलटले. या काळात महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्याकडून हे प्रकरण गांभीर्याने घेतल्याचं अजिबात जाणवत नाही. ज्या ठिकाणी प्रियांश याचं दफन केलं होतं. त्या खड्ड्यावर माती सारुन तो खड्डादेखील आता बुजविण्यात आला आहे. मुर्दांड महापालिकेकडून हे गंभीर प्रकरण बेदखल केल्याचं जाणवत आहे.**



प्रियांश वाघमारे
**मृतदेह गायब प्रकरण**



**सोलापूर : मृतदेह गायब प्रकरणातून थोडी जाग आलेल्या अक्कलशून्य महापालिकेने या स्मशानभूमीतील काटेरी झाडे काढण्यासाठी केवळ एकच दिवस जेसीबी चालवला. दुसऱ्यादिवशी जेसीबी गायब झाला अन् मोदी स्मशानभूमीतील काटेरी झाडे झुडपे तशीच राहिली.**



**सोलापूर : मोदी स्मशानभूमीमधील हेच ते ठिकाण, ज्या खड्ड्यातून प्रियांश याचा मृतदेह उकरण्यात आल्याचा आरोप झाला. त्या खड्ड्यात अशी माती सारून तो जवळपास बुजविला आहे.**

- **मुर्दांड महापालिकेकडून विषय बेदखल;**
- **पोलीस भरतीचं कारण पुढं करत 'खाकी'वर्दीनं ठेवली बाजूला फाईल**
- **दारुडा कर्मचारी राजू डोलारेचा मोदी स्मशानभूमीत ठिय्या कायम**
- **मित्रांसमवेत विद्युत दाहिनी विभागात ओल्या सुक्या पार्ट्यांचा सिलसिला**
- **महापालिकेने ना सुरक्षा रक्षक नेमला... ना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या हालचाली केल्या**

दरम्यान पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी या घटनेच्या सखोल तपासाचे आदेश देऊनसुद्धा या प्रकरणाचा शुन्य तपास जोडभावी पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठेवला. पोलीस भरतीचे काम आहे, अशी सबब पुढं करत प्रियांश वाघमारे प्रकरणाच्या चौकशीची फाईल बाजूला ठेवल्याचे स्पष्ट झाले.

विशेषत्वे, मोदी स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनी या अत्यंत जोखमीच्या अन् महत्त्वाच्या विभागाकडं कार्यरत असलेला राजू डोलारे यानं चक्क या स्मशानभूमीतच मित्रांना घेऊन बिनधास्तपणे दारु अड्डा केल्याचे उघड होऊनसुद्धा महापालिकेच्या नगरअभियंता विभागानं त्याच्यावर कोणतीच कारवाई केली नाही. राजू डोलारे दिवस-रात्र नशापाणी करत या स्मशानभूमीमधील जबाबदारी पार पाडतोय. सोमवारी (ता.२४) मोदी स्मशानभूमीमध्ये फेरफटका मारुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा हे इथले हे वास्तव दिसून आले. प्रियांश वाघमारेचा मृतदेह गायब होण्याचे गंभीर प्रकरण अत्यंत मुर्दाड असलेल्या महापालिका प्रशासनातील नगरअभियंता विभागानं खूप हलक्यात घेतलं. गेंड्याची कातडी पांघरलेल्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाचे कसलेच सोयरसुतक दिसले नाही.

मृतदेह गायब होण्याचा प्रकार उघडकीस येऊन आठ दिवस उलटून गेले. या स्मशानभूमीत अद्याप कोणतीच सुरक्षा यंत्रणा महापालिका प्रशासनानं कार्यान्वीत केली नाही. एकाही सुरक्षा रक्षकांची नियुक्ती या ठिकाणी केली नाही. या घटनेचा तपास करण्यात पोलीसांकडून दूर्लक्ष झालं हेच महापालिका प्रशासनाच्या जणू पथ्यावर पडलं.

### अतिरिक्त आयुक्त कारंजेचे आश्वासन विरले हवेत

प्रियांश याचा मृतदेह गायब झाल्यानंतर मोदी स्मशानभूमीत सुरक्षा यंत्रणा लावू, कर्मचारी नेमू, सीसीटीव्ही कॅमेरे बसवू अशी आश्वासनं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली होती. ही आश्वासनं जणू हवेत विरली. त्यांच्या सांगण्यावर आठ दिवस गेले. मात्र मोदी स्मशानभूमीत कसलीच सुधारणा नाही.

### अद्याप खड्डे खोदणारे वगैरे सगळेच मोकाट

मृतदेह गायब प्रकरणी मोदी स्मशानभूमी वर्तुळात जाऊन अधिक माहिती घेतली असता दफनासाठी जे खड्डे पाडून देतात त्यांच्यासह स्मशानभूमीत वावर असणाऱ्या कोणालाच चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेले नाही. चौकशीसाठी सहाजणांना ताब्यात घेतले होते, असे पोलिसांनी सांगितलं होतं. ते सहाजण कोण? असा प्रश्न मोदी स्मशानभूमीमध्ये वावर असणाऱ्या महापालिका कर्मचारी राजू डोलारे तसेच खड्डा खोदणारे मल्लिकार्जून आणि पंडित म्हेत्रे यांनादेखील पडला आहे.

### गोरगरीब नातेवाईकांची होतेय लुबाडणूक

मोदी स्मशानभूमीत दफन किंवा सरपणार, विद्युत दाहिनीवर अत्यसंस्कार होतात. यामध्ये खूप वेळा ज्यांचा मृत्यू होतो ते गरीब कुंटुंबातील असतात. त्यांचे गरीब नातेवाई प्रेत घेऊन अंत्यसंस्कारासाठी येतात तेव्हा त्यांना मोठ्या पैशाची मागणी होते. वेळेत अंत्यसंस्कार होणं हे त्यांच्यासाठी महत्त्वाचं असतं. त्यामुळं गोरगरीब नातेवाईक गुपगुपान पैसे काढून देतात. या प्रकरणात त्यांनी प्रसंगी व्याजानेदेखील पैसे घ्यावे लागतात. स्मशानभूमीत जादा पैसे घेऊन त्यांची लूबाडणूक होते.



**सोलापूर : मोदी स्मशानभूमीत दफनविधीसाठी असा खड्डा घेतला जातो. जो उकरण्यावर आता आक्षेप आला आहे.**

### सांगेल तो आकडा मिळतो; राजू डोलारे बनला 'डॉन'

दफन किंवा सरपणावर अत्यंसंस्कार विधीवत पार पडावे. प्रेताची विटंबना होऊ नये, शिवाय शेवटचा खर्च संबंधित व्यक्तीवर असतो त्याचबरोबर मृताचे नातेवाईक दुखात असतात. हेच राजू डोलारे याच्या पथ्यावर पडत आहे. तो सांगेल तो आकडा मृताचे नातेवाई देतात. वास्तविक इलेक्ट्रीक ऑपरेटर या पदावर असलेल्या राजू डोलारे याची जबाबदारी फक्त विद्युत दाहिनीवर अंत्यसंस्कार करुन द्यायची आहे. मात्र तो या स्मशानभूमीतील दफन आणि सरपणावर अत्यंसंस्कार करणं अशी सगळी कामं पैसे घेऊन करतोय. या कामांसाठी मोठी गँग त्यांनं स्मशानभूमीत कार्यरीत ठेवली आहे.

### प्रियांशच्या गायब मृतदेहाचं अखेर काय?

पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी प्रियांश वाघमारेच्या गायब मृतदेह प्रकरणाचा छडा लावू, संबंधित प्रकार नरबळी आहे, का हे बघु असा प्रसारमाध्यमांना सांगितलं होतं. मात्र आठ दिवसात या प्रकरणाचा तपास शून्य आहे. तेव्हा या प्रकरणाचा तपास पोलीस करणार की हिंस्त्र प्राण्यांनी मृतदेह उकरुन खाल्ला असा चौकशी न करताच अहवाल पोलीस आयुक्तांना देणार, त्यावरुन पोलीस आयुक्त या अहवालाचे आधारे प्रसारमाध्यमांना माहिती देऊन या विषयावर पडदा टाकणार? असा मुद्दा मृत प्रियांश याच्या नातेवाईकांकडून आता उपस्थित केला जात आहे.

## पिकअपच्या धडकेने दुचाकीस्वार तरूण जागीच ठार; मोरूची येथील घटना

✔ **नातेपुते/प्रतिनिधी**

दुचाकीवरून जात असताना अनोळखी पिकपच्या धडकेने दुचाकी वरील ३० वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात मोरूची (ता.माळशिरस) येथील शिंगणापूर पाटीजवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला.

दाजी किरण देवकाते (वय ३० रा.भिगवण ता.इंदापूर) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. या प्रकरणी ऋषिकेश चंद्रकांत डोंबाळे (रा.मोरोची) यांनी नातेपुते पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. डोंबाळे आणि देवकाते हे दोघे नातेपुते येथील हॉटेलमध्ये जेवण करून निघाले होते. शिंगणापूर पंपावर पेट्रोल भरून ते पुणे पंढरपूर रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी पुण्याहून पंढरपूरकडे जाणाऱ्या पिकअपच्या धडकेने दोघेजण जखमी झाले. त्यापैकी देवकाते मयत झाला.

## विजेच्या शॉक बसून शेतकऱ्याच्या मृत्यू

**उळेवाडी येथील घटना**

✔ **सोलापूर** : उळेवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे स्वतः च्या शेतात बोअरचे बटन चालू करताना शॉक बसल्याने पांडुरंग गोरखनाथ गायकवाड (वय ४४) हे बेशुद्ध होऊन उपचारादरम्यान मयत झाले. काल रविवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास ते आपल्या शेतातील बोअरचे बटन चालू करण्यासाठी गेले होते.त्यावेळी हा प्रकार घडला. बेशुद्ध अवस्थेत त्यांना खाजगी रुग्णालयास उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## लोंढेवाडी येथे कोयत्याने मारहाण

### वृद्ध दांपत्य जखमी

✔ **माढा** : शेत जमिनीच्या वादातून ऊस तोडण्याचा कोयता आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत वृद्ध महिला आणि त्यांचे पती असे दोघेजण जखमी झाले . ही घटना लोंढेवाडी (ता.माढा) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात माढा पोलिसांनी ३ महिलांसह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. छबाबाई चांगदेव देवकर (वय ७०) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सचिन शिंगाडे, अण्णा मस्के, अविनाश मस्के, नवनाथ मस्के, विशाल देवकर, गंगुबाई देवकर, कल्पना शिंगाडे आणि सुलभा मस्के (सर्व रा.माढा परिसर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत देवकर दांपत्य हे शेतात काम करीत होते. त्यावेळी सचिन नवनाथ शिंगाडे हा त्यांच्या शेतात नांगर मारत होता. यासंदर्भात छबाबाई यांनी विचारणा केली असता त्याने कोयत्याने मारहाण केली. तर अन्य आरोपींने दोघांना लाथाबुक्याने मारहाण केली अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार दराडे पुढील तपास करीत आहेत.

## बाजार समितीसमोरील उड्डाणपुलाच्या कामाचा आ. विजयकुमार देशमुखांनी घेतला आढावा

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील चौक आता लवकरच अपघात मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. बाजार समिती समोर होणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाचा आढावा माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी सोमवारी पाहणी करून घेतला. निधी मिळून कार्यारंभ आदेश मिळाल्यामुळे या मागणीला लवकरच मूर्त स्वरूप येणार आहे.

बाजार समिती समोर २ किमीचा उड्डाणपूल बांधण्यासाठी केंद्रीय रस्ते विकास वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडून ५० कोटी रुपयांचा निधी देशमुख यांनी मिळवला आहे. लवकरच या कामात सुरुवात होणार आहे.

माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख म्हणाले, पुणे, हैदराबाद आणि विजयपूर येथून येणारी जड वाहने या चौकात एकत्र येतात. तसेच शेजारीच बाजार समिती असल्याम ुळे वाहतूक सतत सुरू असते. या चौकात सातत्याने वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होतो. परिणामी, चौकात झालेल्या अपघातांमध्ये अनेकांचा जीव गेला आहे. त्यामुळे येथून उड्डाणपूल करण्यात यावा अशी मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते विकास वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती.

याप्रसंगी आमदार विजयकुम ार देशमुख, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भारतीय जनता युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ. किरण देशम ुख, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण उपाभियंता महेश येमूल, अनिल विपत, नेते संजय कोळी, श्रीशैल अंबारे, महालिंगप्पा परमशेट्टी, सुरेश हत्ती, महादेव जातकर, नागेश उंबरजे, आशिष दुलंगे आदी उपस्थित होते.



**पुलाच्या कामाबाबत माहिती घेताना आमदार देशमुख व इतर.**

### दोन्ही उड्डाण पुलाबाबत शनिवारी बैठक

सोलापूर शहरातील दोन उड्डाण पुलाबाबत येत्या शनिवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या समवेत बैठक घेण्यात येणार आहे. दोन्ही उड्डाणपूलांचे काम लवकरात लवकर सुरू करुन लवकर पूर्ण व्हावे याबाबत चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.

## पंढरीत मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन

- **आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांची माहिती**
- **दोन ठिकाणी ५० खाटांचे तात्पुरते रुग्णालय उभारणार**

✔ **पंढरपूर/प्रतिनिधी**

**आषाढी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी, भाविक येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाच्या वतीने मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. आरोग्याची वारी पंढरीच्या दारी'या संकल्पनेवर आधारित वारी कालावधीत प्रत्येक भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील वैद्यकीय कर्मचारी, डॉक्टर्स यांच्यासह परराज्यातून देखील वैद्यकीय पथके मागविण्यात येणार आहेत. तसेच पालखी सोहळा प्रस्थानापासून वारकरी भाविकांच्या आरोग्य सेवेसाठी आरोग्य यंत्रणा कार्यरत राहणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी सांगितले.**

आषाढी यात्रा कालावधीत मोफत महाआरोग्य शिबिर आयोजनाबाबत पंढरपूर येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे,आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, राज्य आरोग्य शिक्षणचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले व इतर अधिकारी उपस्थित होते.

डॉ. तानाजी सावंत म्हणाले, पंढरपूर येथे वाखरी व तीन रस्ता येथे महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे.तसेच गोपाळपूर व ६५ एकर येथे ५० खाटांचे तात्पुरते सुसज्ज रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या शिबिरात सुसज्ज आरोग्य यंत्रणेसह तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाकडून मुबलक औषध पुरवठा, पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणी करण्यात येणार आहे.



**पंढरपूर येथे आयोजित बैठकीत बोलताना आरोग्य मंत्री तानाजी सावंत. सोबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासह शासकीय अधिकारी दिसत आहेत.**

### या केल्या सूचना

दिंड्यांच्या प्रत्येक मार्गावर आरोग्य विभागाचे सर्व दवाखाने तसेच खासगी हॉस्पिटल २४ तास सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, महावितरण विभागाने ज्यादा रोहित्रांची सुविधा व मुबलक मनुष्यबळाची व्यवस्था ठेवावी, शहरातील वीज वाहक तारा झाडाझुडपांच्या फांद्यात अडकल्या असतील तर फांद्या तात्काळ काढून घ्याव्यात, नदीपात्रात नळ कनेक्शनची संख्या वाढवावी, स्वच्छतेसाठी ज्यादाचे कर्मचाऱ्यांची उपलब्धता ठेवावी, वाळवंटात तात्पुरते कचरा कुंड्या कराव्यात, वाळवंटात बाईक म्बुलन्स ची उपलब्धता ठेवावी, पोलीस प्रशासनाने वारी कालावधीत वाहतूक व्यवस्था सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी प्रशासनातील सर्वच विभागाने समन्वयने काम करावे अशा सूचनाही आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी केल्या.

## नान्नज येथे वृद्ध वडिलास मारहाण

✔ **सोलापूर** : शेतात पेरणी करू नको, असे सांगितल्याच्या कारणावरून जन्मदात्या वृद्ध पित्यास मुलाने लाकडी दांडका तर सुनेने दगडाने मारहाण करून जखमी केले. ही घटना (नान्नज ता.उत्तर सोलापूर) येथील वगरे यांच्या शेतात रविवारी दुपारच्या सुमारास घडली. या संदर्भात भागवत रामा वगरे (वय ७४ रा. नान्नज) यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्यांचा मुलगा म्हाळप्पा वगरे आणि सून संगीता वगैरे या दांपत्यावर गुन्हा दाखल केला. वगरे यांच्या शेतात म्हाळप्पा हा ट्रॅक्टर घेऊन पेरणी करीत होता. त्यावेळी भागवत यांनी मुलास तू पेरणी करू नको, असे सांगितले होते. तेंव्हा त्याने तुझा काय संबंध, मी पेरणी करणारच असे म्हणत त्याने वडिलांना खाली ढकलले आणि लाकडी दांडक्याने मारहाण केली. हवालदार चव्हाण तपास करीत आहेत.

